कृषी विभाग,

जिल्हा परिषद,अहिल्यानगर

# यशोगाथा

(१) योजना- बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना

सन २०१८-२०१९

पंचायत समिती अकोले

(२) योजना- बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील)

सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३

पंचायत समिती संगमनेर

(३) योजना - डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

सन २०२१-२०२२

पंचायत समिती संगमनेर

# यशोगाथा

## बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सन २०१८-२०१९

लाभार्थी- श्रीमती भोराबाई पंढरी पेढेकर , रा.बिताका ता.अकोले जि.अहमदनगर




बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (TSP) योजनेतून अल्प उत्पन्न असलेल्या,अनु.जमातीच्या शेतकऱ्यांना सिंचन विषयक बाबीकरिता नवीन विहीर,जुनी विहीर दुरुस्ती,शेततळे अस्तरीकरण,वीज जोडणी,पीव्हीसी पाईप, पंपसंच,तुषारसंच,ठिबकसंच या बाबीकरिता पॅकेज स्वरुपात अनुदान दिले जाते.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील दुर्गम भागातील मौजे बिताका येथील श्रीमती भोराबाई पंढरी पेढेकर यांची सर्वे नं ६३/५ मध्ये १.०० हेक्टर जमीन आहे. त्यांनी बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना सन २०१८/१९ या वर्षात पंचायत समितीकडे अर्ज केला. त्यानंतर लॉटरी प्रक्रियेद्वारे महिला लाभार्थी असल्याने त्यांची लाभ देणेसाठी प्राधान्यक्रमाने निवड करणेत आली.

श्रीमती भोराबाई पंढरी पेढेकर यांचेकडे जमीन असूनही पावसाच्या पाण्यावर पारंपारिक पद्धतीने केवळ भात पिक घेत होते. शाश्वत सिंचनाची सुविधा नसल्याने बागायती पिक घेता येत

नव्हते. भात पिक काढलेनंतर त्यांना उदरनिर्वाह करण्यासाठी बाहेरगावी जाऊन मोलमजुरी करत होते. त्यांनी योजनेमधुन  विहिरीचे काम पूर्ण केल्यानंतर पंचायत समिती कडून रक्कम रु.२,५०,०००/- अनुदान त्यांचे बँक खात्यावर वर्ग करणेत आले.

नविन विहिरीचे काम केल्यानंतर विहिरीला पाणी लागले व सोबतच त्यांना सिंचनाकरीता पंपसंचाचा लाभ दिल्याने  त्यांनी आपले शेतात भाजीपाला पिके,भुईमुग, गहू हरभरा अशा पिकांचे माध्यमातून बारमाही शेती करण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे फळबाग (आंबा) लागवड केली.शाश्वत सिंचनाची सोय झाल्यामुळे त्यांना पहिल्याच वर्षात १,४०,०००/- उत्पन्न मिळाले. तसेच पाण्याची सोय झाल्याने जनावरांना वेळेत हिरवा चारा उपलब्ध होऊन दुग्ध उत्पादन वाढले. लाभार्थीला आपलेच शेतात काम करून रोजगार उपलब्ध झाला व समाधानकारक उत्पन्न मिळण्यास सुरुवात झाली.

# महाराष्ट्र शासन,
# कृषी विभाग,
# जिल्हा परिषद,अहिल्यानगर,
# पंचायत समिती संगमनेर

# नविन विहीर पॅकेज यशोगाथा

## योजना –बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील)

## सन 2021-2022 व 2022-2023

**बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील)सन 2021-2022 व 2022-2023 यशोगाथा**

लाभार्थीचे नांव :-**श्री.अशोक लालू गोंधे,**रा.खंदरमाळवाडी

गट क्र./सर्व्हे क्र.:-219/5पैकी,क्षेत्र:- 2.00हे.,ठिकाण:-खंदरमाळवाडी,ता.संगमनेर,जि. अहिल्यानगर

**मंजूर घटक व प्रत्यक्षात पूर्ण केलेले घटक**

| अ. क्र. | मंजूर घटक | अनुदान रक्कम रू. | प्रत्यक्ष अदा केलेले अनुदान | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | नविन विहीर | 250000/- | 250000/- | विहीरीचे काम पूर्ण |
| 2 | पंपसंच | 20000/- | 20000/- | पंपसंच खरेदी पुर्ण |
| 3 | पीव्हीसीपाईप | 30000/- | 30000/- | पंपीव्हीसी पाईप खरेदी पुर्ण |
| **एकूण** | | 3,00,000/- | 3,00,000/- | |

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्राबाहेरील) सन 2017-2018 पासून कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेत जुन्या आदीवासी उपयोजना या योजनेच्या तुलनेत सिंचन विषयक बाबीकरिता भरीव तरतूद करणेत आलेली आहे. सदर योजनेतून 150000/- चे आत उत्पन्न असलेल्या अनु.जातीच्या शेतक-यांना सिंचन विषयक बाबी करिता नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळे अस्तरीकरण, पी.व्ही.सी. पाईप, वीज जोडणी, सौर कृषी पंप लाभार्थी हिस्सा, पंप संच, तुषार सिंचन संच, ठिबक सिंचन संच या बाबी करिता भरीव व पॅकेज स्वरुपात अनुदान दिले जाते. या योजनेमध्ये लाभार्थी शेतक-याच्या सिंचन विषयक सर्व गरजा एकाच योजनेतून एकाच वेळी पूर्ण होत असल्याने ही योजना अतिशय लोकप्रिय झाली आहे.

श्री.अशोक लालू गोंधे यांची लॉटरी प्रक्रियेद्वारे नविन सिंचन विहीर या घटकासाठी निवड झाल्यानंतर त्यांचेशी कृषी अधिकारी श्री. कडलग यांनी त्यांना संपर्क करून कागदपत्र अपलोड करणेबाबत मार्गदर्शन केले.



तसेच त्यांचे क्षेत्राची पहाणी केली व त्याचवेळी त्यांना वीजजोडणी आकार, पंपसंच,पी.व्ही.सी. पाईप व ईनवेलबोअरींग या घटकांसाठी अर्ज करण्याबाबत सांगून त्यांचेकडून तसे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर नोंदऊन घेतले.

त्यांची अहिल्यानगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यात खंदरमाळवाडी शिवारात 2.00 हे. शेतजमिन असून सदर क्षेत्र पुर्णपणे कोरडवाहू असल्याने खरीपात बाजरी सारखी कोरडवाहू पीक घेत असत व रब्बी उन्हाळी हंगामामध्ये सदर क्षेत्र पडीत राहात असे, तसेच पीकासाठी लागणारा खर्च जास्त व येणारे उत्पन्न कमी त्यामुळे शेती कायम तोटयात येत असत.त्यामुळे त्यांचे कुटुंबासमोल मजूरी करून उदर निर्वाह करावा लागत होता.

नविन विहीरीचे कामास मंजूरी मिळाल्यानंतर त्यांनी लगेचेच विहीरीचे कामास सुरूवात केली.




काम चालू असतांनाच विहीरीस पाणी उपलब्ध झाले व श्री. गोंधे यांनी विहीरीचे कामही वेळेत पूर्ण केले.




त्यानंतर सन 2023-2024 मध्ये पंपसंच, पी.व्ही.सी. पाईप या घटकांसाठी त्यांची निवड झाली. त्यामुळे त्यांना शेतीचे सिंचनासाठी शास्वत साधन उपलब्ध झाले आहे. श्री. गोंधे यांनी शेतीचे काही क्षेत्रामध्ये वांगे, वालवड व फळबाग लागवड करून उपलब्ध पाण्याचा वापर करून चांगल्या पध्दतीने उत्पन्न घेत आहेत.




या कामाची व त्यावर घेतलेल्या पिकांची पहाणी मा. डॉ. तुकाराम मोटे, कृषि सहसंचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय पुणे यांनी केली असता समाधान व्यक्त केले आहे.






श्री. गोंधे यांनाआपलेच शेतात काम करून रोजगार उपलब्ध झाला व समाधानकारक उत्पन्न मिळत असल्याने त्यांना आता मजूरीसाठी बाहेर जाण्याची आवश्यकता राहीली नाही. नविन सिंचन विहीरीमुळे सिंचनासाठी खात्रीशीर साधन उपलब्ध झाले असून लाभार्थीचे कोरडवाहू क्षेत्र पुर्णपणे बागायत झाले असल्याने शेती ऊत्पन्नात भरीव वाढ होऊन कुटुंबाची आर्थीक व पर्यायाने शैक्षणिक व सामाजिक प्रगती होणार आहे.

श्री. गोंधे यांना योजनेअंतर्गत एकूण रू. 300000/- एवढे अनुदान अदा करण्यात आले असून,अनुदान थेट त्यांचे बँक खात्यावर काम पुर्ण झाल्यावर कमीत कमी कालावधीत वर्ग करण्यात आले असून प्रत्येक टप्प्यावर पंचायत समितीचे कृषी अधिकारी यांनी योग्य मार्गदर्शन केल्याने श्री. गोंधे व त्यांचे कुटुंबीय यांनी समाधान व्यक्त केले व त्यांचे सर्व कुटुंबीय आनंदात आहेत.हीच या योजनेची यशोगाथा आहे.

या योजनेमध्ये सदयस्थितीत नविन विहीर खोदण्यासाठी जवळपास 4 लक्ष रूपये खर्च येत आहे तसेच दोन विहीरीतील 500 फुट अंतराचे अटीमुळे लाभार्थीस आवश्यक असलेल्या ठिकाणी विहीर खोदता येत नाही व पीव्हीसीपाईप पंपसंच यांचे ही दर मोठयाप्रमाणात वाढल्याने या परिसरातील माझे सारखे ईच्छूक लाभार्थी यायोजनेत लाभघेण्यासतयारहोतनाहीत, तरी यामध्ये शासनाने विचार करून अनुदान मर्यादा वाढ करून दोन विहीरीतील 500 फुट अंतराची अट शिथील केल्यास या योजनांचा लाभ घेण्यास आणखी शेतकरी पुढे येतील असे लाभार्थीने मत व्यक्त केले.

# महाराष्ट्र शासन,
# कृषी विभाग,
# जिल्हा परिषद अहिल्यानगर,
# पंचायत समिती संगमनेर

# नविन विहीर पॅकेज यशोगाथा

योजना - डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२१-२०२२

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२१/२२ यशोगाथा

लाभार्थीचे नांव :-**श्री.नंदू कचरू मोकळ** रा.देवकौठे

गट क्र./ सर्व्हेक्र. :-१२३ पैकी,क्षेत्र :- ०.७७ हे., ठिकाण :-देवकौठे, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

### मंजूर घटक व प्रत्यक्षात पूर्ण केलेले घटक

| अ. क्र. | मंजूर घटक | अनुदान रक्कम रू. | प्रत्यक्ष अदा केलेले अनुदान | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | नविन विहीर | २५००००/- | २५००००/- | विहीरीचे काम पूर्ण |
| २ | इनवेल बोअरींग | २००००/- | २००००/- | इनवेल बोअरींगचे काम पूर्ण |
| ३ | पंपसंच | २००००/- | २००००/- | पंपसंच खरेदी करून कार्यान्वित |
| ४ | वीजजोडणीआकार | १००००/- | ------ | वीजवितरणकडे अर्ज दाखल असून अदयाप कोटेशन प्राप्त नाही |
| **एकूण** | | **३,००,०००/-** | **२,९०,०००/-** | |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०१७/१८ पासून कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेत जुन्या विशेष घटक योजनेच्या तुलनेत सिंचन विषयक बाबीकरिता भरीव तरतूद करणेत आलेली आहे. सदर योजनेतून १५००००/- चे आत उत्पन्न असलेल्या अनु.जातीच्या शेतक-यांना सिंचन विषयक बाबीकरिता नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळे अस्तरीकरण, वीज जोडणी, सौर कृषी पंपलाभार्थीहिस्सा, पंप संच, तुषार सिंचन संच, ठिबक सिंचन संच या बाबीकरिता भरीव व पॅकेज स्वरुपात अनुदान दिले जाते. या योजनेमध्ये लाभार्थी शेतक-याच्या सिंचनविषयक सर्व गरजा एकाच योजनेतून एकाच वेळी पूर्ण होत असल्याने ही योजना अतिशय लोकप्रिय झाली आहे.




श्री.नंदू कचरू मोकळयांची लॉटरी प्रक्रियेद्वारे नविन सिंचन विहीर या घटकासाठी निवड झाल्यानंतर त्यांचेशी कृषी अधिकारी श्री.कडलग यांनी त्यांना संपर्क करून कागद पत्र अपलोड करणेबाबत मार्गदर्शन केले व त्याचवेळी त्यांना वीजजोडणी आकार, पंपसंच व ईनवेलबोअरींग या घटकांसाठी अर्ज करण्याबाबत सांगून त्यांचेकडून तसे अर्ज महाडीबीटीप्रणालीवर नोंदऊन घेतले.

त्यांची अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यात देवकौठे शिवारात ०.७७ हे. शेतजमिन असून सदर क्षेत्र पुर्णपणे कोरडवाहू असल्याने खरीपात बाजरीसारखी कोरडवाहू पीक घेत असत. परंतू पीकासाठी लागणारा खर्च जास्त व येणारे उत्पन्न कमी त्यामुळे शेती कायम तोटयात येत असत.त्यामुळे त्यांचे कुटुंबासमोल मजूरी करून उदरनिर्वाह करावा लागत होता.

नविन विहीरीचे कामास मंजूरी मिळाल्यानंतर त्यांनी लगेचेचविहीरीचे कामास सुरूवात केली.





विहीरीचे काम वेळेतपूर्ण केले व सुदैवाने त्यांचे विहीरीस पाणी उपलब्ध झाले.





त्याच दरम्यान वीजजोडणी आकार, पंपसंच व ईनवेलबोअरींग या घटकांसाठी ही त्यांची निवड झाली.लगेचच कागदपत्र अपलोड केले असता जिल्हा प्रशासनाकडून तात्काळ मंजूरी ही प्राप्त झाली. त्यानुसार वीजवितरण कंपनीकडे ही नविन वीजजोडणीसाठी ऑनलाईन अर्ज सादर केला.परंतू उपलब्ध पाणी उन्हाळी हंगामात पुरणार नाही असा अंदाज श्री.मोकळ यांना आल्या नेत्यांना मंजूर असलेले ईनवेलबोअरींगचे कामकरण्याची तयारी केली. त्यानुसार ईनवेलबोअरींगचे काम केले असता त्यात मुबलक पाणी उपलब्ध झाले.





त्यानंतर लगेचच त्यांनी पंपसंच खरेदी केला व सोयाबीन पीकास टंचाई कालावधीत सिंचनासाठी वापर केला.त्यामुळे त्यांचे सोयाबीन पीक ऊत्तम आले.०.६० हे.क्षेत्रामध्ये त्यांना ऊत्तमगुणवत्तेचे १२ क्वींटल सोयाबीनचे ऊत्पन्न मिळाले.





नविन सिंचन विहीर, त्या सोबत चईनवेलबोअरींग यामुळे मुबलक पाणी ऊपलब्ध झाले, तसेच सिंचन करण्यासाठी पंपसंच ही उपलब्ध झाल्याने व हे पाणी पुर्ण ऊन्हीळी हंगामात ही ऊपलब्ध राहील असा लाभार्थीस विश्वास असल्याने लाभार्थीने रब्बी हंगामात धान्यासाठीची मका पीक लागवड तसेच रेशीम ऊदयोग सुरू करण्यासाठी तु ती पीकाची लागवड करण्याची तयारी केली आहे.

श्री. मोकळयांना या क्षेत्रामधून त्यांना साधारण २० ते २५ क्वींटल मका पीकाचे ऊत्पन्न अपेक्षीत असून त्यापासून व रेशीम ऊदयोगापासून साधारण ७५ हजारते १.० लक्ष रूपयांचे ऊत्पन्न अपेक्षीत आहे.



श्री.मोकळ यांना आपलेच शेतात काम करून रोजगार उपलब्ध झाला व समाधानकारक उत्पन्न मिळणार असल्याने त्यांना आता मजूरीसाठी बाहेर जाण्याची आवश्यकता राहीली नाही.नविन सिंचन विहीर व पंपसंचामुळे सिंचनासाठी खात्रीशीर साधन ऊपलब्ध झाले असून लाभार्थीचे कोरडवाहू क्षेत्र पुर्णपणे बागायत झाले असल्याने शेती ऊत्पन्नात भरीव वाढ होऊन कुटुंबाची आर्थीक व पर्यायाने शैक्षणिक व सामाजिक प्रगती होणार आहे व श्री. मोकळ यांना योजनेअंतर्गत एकूण रू. २,९०,०००/- एवढे अनुदान अदा करण्यात आले असून, प्रत्येक घटकाचे अनुदान थेट त्यांचे बँक खात्यावर काम पुर्ण झाल्यावर कमीत कमी कालावधीत वर्ग करण्यात असून प्रत्येक टप्प्यावर पंचायत समितीचे कृषी अधिकारी यांनी योग्य मार्गदर्शन केल्याने श्री. मोकळ व त्यांचे कुटुंबीय यांनी समाधान व्यक्त केलेव त्यांचे सर्व कुटुंबीय आनंदात आहेत.हीच या योजनेची यशोगाथ आहे.